महा मेट्रो
PUNE METRO

**महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)**

**• महा मेट्रो व्यवस्थापकीय संचालक डॉ. दीक्षित यांना प्रतिष्ठित आयआयबीईतर्फे लाइफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार**

**• आज मुंबई येथील कार्यक्रमात पुरस्कार वितरण, डॉ. दीक्षित यांचा होणार सत्कार**




**पुणे:** आज दिनांक १५ जुलै रोजी इंडियन इन्स्टिट्यूशन ऑफ ब्रीज इंजिनीअर्सच्या (आयआयबीई- IIBE) वतीने राष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात उत्कृष्ठ सेवा केल्या बद्दल महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांना प्रतिष्ठित "विशेष लाइफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार" प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्रातील विकासाच्या दृष्टीने महत्वाकांक्षी अश्या पुणे मेट्रो आणि नागपूर मेट्रोसारख्या प्रकल्पांची यशस्वीपणे निर्मिती करून, महाराष्ट्राच्या सार्वजनिक वाहतूक प्रणालीत तसेच विकासात्मक कार्यात ऐतिहासिक सकारात्मक बदल घडवून आणले आणि भारतासह आशिया खंडात नावाजले जातील असे मानांक कायम केले.

डॉ दीक्षित यांना हा पुरस्कार उल्लेखनीय आहे कि, महा मेट्रोला नुकतेच आशिया खंडातील सर्वात लांब पुलाचे बांधकाम केल्याबद्दल प्रतिष्ठित आशिया आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स तर्फे प्रमाणपत्र केंद्रीय मंत्री श्री.

नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले होते आणि या करता श्री. गडकरी यांनी  महा मेट्रोच्या कार्याचे विशेष कौतुक केले. या व्यतिरिक्त मागील महिन्यात कॉन्फडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स च्या (केट) वतीने  डॉ. ब्रिजेश दीक्षित यांना "भामाशाह" पुरस्कार देऊन त्यांचा नागरी सत्कार देखील करण्यात आला होता. नुकतेच महामेट्रोने पुण्यातील नळ स्टॉप स्थानकाच्या जवळ ५०० मीटर अंतराचा डबल डेक्कर पूल उभारला आहे.

महा मेट्रोच्या वतीने पुणे आणि नागपूर शहरांमध्ये मेट्रो रेल प्रकल्प राबविण्यात येत असून या ठिकाणी महा मेट्रोने मेट्रोचे संचालन देखील सुरु केले आहे. नागपुरात मेट्रो प्रकल्पासह सेंट्रल रॉड फंड अंतर्गत विविध विकास कामे महा मेट्रो राबवत आहे. पुणे आणि नागपूर शिवाय, नाशिक शहराकरिता मेट्रो नियो प्रकल्पाचे नियोजन केले आहे. तसेच ठाणे शहराकरिता मेट्रो रेल प्रकल्पाचा विस्तृत आराखडा तयार केला आहे. पुणे फेज २ मेट्रोचा प्रकल्प अहवाल बनविण्याचे  कामही प्रगती पथावर आहे तर नागपूर फेज २ प्रकल्प शासनाकडे अंतिम मान्यतेसाठी आहे.

महाराष्ट्र राज्याशिवाय तेलंगणा राज्यातील वारंगल शहराकरिता देखील महा मेट्रोने प्रकल्पाचा विस्तृत आराखडा तयार केला आहे. तसेच नवी मुंबई येथे सिडको राबवत असलेल्या मेट्रो रेल प्रकल्पाचे संचालन करण्याकरिता १० वर्षाच्या कालावधीकरिता महा मेट्रोची नियुक्ती करण्यात आली असून त्या ठिकाणी देखील तीव्र गतीने कार्य महा मेट्रोच्या वतीने पूर्ण करण्यात येत आहे. महा मेट्रोच्या कार्याची नोंद देशातील अनेक संघटनानी घेतली असून डॉ. दीक्षित यांना विशेष लाइफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार महा मेट्रोच्या कार्याची पावती आहे.

या प्रसंगी डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी म्हंटले आहे की, "महामेट्रो जागतिक दर्जाचे मेट्रो प्रकल्प महाराष्ट्रात उभारत आहे. मला मिळालेला सन्मान हा महामेट्रोसाठी काम करणाऱ्या प्रत्येकाचा सन्मान आहे. महामेट्रोच्या कामांसाठी केंद्र व राज्य सरकार तसेच सर्व शासकीय संस्थांचे सर्वतोपरी सहाय्य मिळत आहे. त्यामुळेच हे महत्वाकांक्षी प्रकल्प महामेट्रो पूर्ण करू शकते."

